२

९३ल्प

वाचा :- १. संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्र.५९, दिनांक ०५.१०.१९९५.
२. संचालनालयाचे परिपत्रक क्र. स्था-१८/ब/अ शाखा/अे अे १/७०९, दिनांक. १७.०४.१९९८.
३. संचालनालयाचे पत्र क्र.स्था-१८/ब/न.पा.वर्धा / अे अे ३/११५७, दिनांक. २७.०६.२०११.

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय,**
**महाराष्ट्र राज्य, कोंकण भवन, ६ वा माळा,**
**नवी मुंबई ४०० ६१४**
**दिनांक :-**

विषय :- विशेष लेखापरीक्षण कार्यपध्दती.

**कार्यालयीन आदेश क्रमांक : ७५ दिनांक : 22 DEC 2015**

उपरोक्त वाचा मधील १,२ व ३ मधील संचालनालयाच्या आदेशानुसार **विशेष लेखापरीक्षणाबाबत** खालीलप्रमाणे आदेशित करण्यात आलेले आहे.

१. संचालनालयाचे आदेश क्र. ५९ दि. ०५.१०.१९९५ नुसार मा. संचालक यांच्या मंजुरीनंतर सह संचालक, ( विभागीय मुख्यालये) यांनी स्थानिक संस्थांच्या विशेष लेखापरीक्षण अहवालाचे **अंतिमीकरण** करुन अहवाल निर्गमित करावयाचा आहे.
२. संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक स्था.१८/ब/अ शाखा/अे अे १/ ७०९, दि. १७.०४.१९९८ नुसार प्रारुप लेखापरीक्षण अहवालास संचालनालयाची पुर्वमान्यता मिळाल्यानंतर अहवाल निर्गमित करण्याचे **आदेश** आहेत.
३. संचालनालयाचे पत्र दि. २७.०६.२०११ नुसार ज्या प्रमाणे नियमित लेखापरीक्षणाचे **अहवाल** निर्गमित करावयाची कार्यवाही करण्यात येते, त्याचप्रमाणे विशेष लेखापरीक्षण अहवालाच्या बाबतीत कार्यवाही करण्यात यावी असे सर्व सह संचालक (विभागीय मुख्यालये ) यांना कळविण्यात आले आहे.

विशेष लेखापरीक्षणासंबंधीच्या उपरोक्त वाचा ०१ ते ०३ या आदेशांतील तरतुदींमध्ये विसंगती असल्यामुळे या तरतुदी अधिक्रमित करण्यात येत आहेत आणि यापुढे विशेष लेखापरीक्षण करण्यास संचालनालयाची मान्यता मिळाल्यानंतर विशेष लेखापरीक्षणाची कार्यपध्दती व कार्यकक्षा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | विशेष लेखापरीक्षण कामकाजाचा प्रकार | **प्राधिकृत अधिकारी / कर्मचारी** | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **जिल्हा परिषद** | **पंचायत समिती** | 'अ' वर्ग नगरपालिका | 'ब' व 'क' वर्ग **नगरपालिका** | **नगरपालिका शिक्षण मंडळे** | **ग्रामपंचायत** |
| १. | लेखापरीक्षणाची जबाबदारी ( पथक प्रमुख ) | सहाय्यक संचालक | सहाय्यक संचालक/ लेखापरीक्षा अधिकारी | लेखापरीक्षा अधिकारी/ स.ले.प.अ. | लेखापरीक्षा अधिकारी/ स.ले.प.अ. | लेखापरीक्षा अधिकारी/ स.ले.प.अ. | स.ले.प.अ./ वरीष्ठ लेखापरीक्षक |
| २. | लेखापरीक्षणाचा आढावा व संनियंत्रण | सह संचालक | सह संचालक | सहाय्यक संचालक | सहाय्यक संचालक | सहाय्यक संचालक | लेखापरीक्षा अधिकारी |
| ३. | लेखापरीक्षण अहवालाचे पुनर्विलोकन | सह संचालक | सह संचालक | सह संचालक | सहाय्यक संचालक | सहाय्यक संचालक | सहाय्यक संचालक |
| ४. | अहवालचे अंतिमीकरण व निर्गमन | सह संचालक | सह संचालक | सह संचालक | सहाय्यक संचालक | सहाय्यक संचालक | सहाय्यक संचालक |

तरी वरीलप्रमाणे विशेष लेखापरीक्षण कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

(का.मा.विधाते)
संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा
महाराष्ट्र राज्य.

प्रत माहिती व कार्यवाहीस्तव :-

१. सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोकण / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

२. सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, सर्व .

३. कार्यालयीन नस्ती.

D asajad letter acer ११.१२.२०१५